।। जे का रंजले गांजले । त्यांसी करुया आपुले ।।

श्री शिवाजी शिक्षण संस्था, उच्च शिक्षण मंडळ, कराडचे

# वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड
# व
# सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कऱ्हाड

यांच्या संयुक्त विद्यमाने

## स्व. सौ. वेणूताई यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी

(२ फेब्रुवारी, २०२५ ते १ फेब्रुवारी, २०२६)

आयोजित

# जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धा

## 'चित्ररेषांतून साकारलेला आदर्श'

(बुधवार, दि. ३० जुलै, २०२५)

तळागाळातील समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मराठी मनाचा मानबिंदू असलेले दृष्टे व्यक्तिमत्व म्हणजे **स्व. यशवंतरावजी चव्हाणसाहेब.** स्व. सौ. वेणूताई ह्या त्यांच्या कौटुंबिक, सार्वजनिक जीवन व कार्यात समर्थ साथ देणाऱ्या सहधर्मचारिणी. अशा या एकरूप, समर्पित व आदर्श व्यक्तिमत्व असलेल्या **स्व. सौ. वेणूताई यशवंतराव चव्हाण** यांची जन्मशताब्दी आम्ही साजरी करीत आहोत.

त्यानिमित्ताने वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड येथे आबाल-वृद्धांसाठी जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

रोख रक्कम स्वरुप :

| | |
|---|---|
| खुला गट | = प्रथम क्रमांक -२०००, द्वितीय क्रमांक - १५००, तृतीय क्रमांक - १०००, उत्तेजनार्थ - ३०० |
| महाविद्यालयीन गट | = प्रथम क्रमांक - १५००, द्वितीय क्रमांक - १०००, तृतीय क्रमांक - ७५०, उत्तेजनार्थ - ३०० |
| माध्य. व उच्च माध्य.गट | = प्रथम क्रमांक -१०००, द्वितीय क्रमांक - ७५०, तृतीय क्रमांक - ५००, उत्तेजनार्थ - २०० |
| प्राथमिक गट | = प्रथम क्रमांक -७५०, द्वितीय क्रमांक - ५००, तृतीय क्रमांक - ३००, उत्तेजनार्थ - १०० |

**शिक्षक व स्पर्धक यांनी स्पर्धेदिवशी सकाळी ९.३० वाजता स्पर्धास्थळी उपस्थित रहावे.**

## अ) प्राथमिक स्तर (५ वी ते ७ वी)

विषय:- १) माझे कुटुंब २) निसर्ग माझा मित्र ३) माझा आवडता सण

## ब) माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तर (८ वी ते १२ वी)

विषय:- १) माझी वसुंधरा २) भारतीय कर्तृत्ववान महिला ३) भारतीय संस्कृती (सण, उत्सव, परंपरा, इ.)

## क) महाविद्यालयीन स्तर (पदवी व पदव्युत्तर विभाग)

विषय:- १) कराड: समृद्ध वारसा २) यशवंतराव व वेणूताई चव्हाण: आदर्श सहजीवन ३) २०४७ मधील भारत

## ड) खुला गट

विषय:- १) स्त्रीशक्तीचा आदर्श: सौ. वेणूताई चव्हाण २) महाराष्ट्राचा जागतिक वारसा ३) शस्त्र नव्हे संवाद हवा

### स्पर्धेचे नियम :-

१) चित्रासाठी कोणतेही रंगमाध्यम वापरता येईल.

२) चित्रासाठी कागद नॉर्वे (पेपर) असावा आणि कागदाचा आकार अ गटासाठी १/८ असावा व ब, क, ड गटासाठी १/४ असावा.

३) स्पर्धकांनी स्पर्धेसाठी लागणारे रंग व इतर साहित्य स्वतः घेऊन येणे आवश्यक आहे. अ ब गटासाठी कागद आयोजक कॉलेज पुरविणार आहे.

४) चित्रावर स्वतःचे नाव, गाव, शाळा/महाविद्यालय असा कोणताही उल्लेख करू नये. फक्त आपल्यासाठी देण्यात आलेल्या कोड नंबरचा उल्लेख आवश्यक आहे.

५) चित्र दिलेल्या विषयावरून तुम्हाला सूचलेले आणि स्वतंत्र असावे.

६) प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह आणि रोख रक्कम पारितोषिक म्हणून देण्यात येईल.

७) सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.

८) सर्व विद्यालय/ महाविद्यालय यांनी आपल्या स्पर्धकांची नावे शनिवार, दिनांक २६ जुलै, २०२५ पर्यंत समन्वयक, जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धा, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड मुख्याध्यापक/प्राचार्यांच्या सहीने पाठवावीत.

९) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

१०) एका शाळेतून /महाविद्यालयातून एका गटासाठी एकच स्पर्धक पाठविता येईल.

११) बक्षीसप्राप्त निवड झालेल्या चित्रांचे प्रदर्शन स्व. सौ. वेणूताई यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी सांगता समारंभादिवशी भरविण्यात येईल.

१२) भोजन व प्रवासखर्च स्वतः करावा.


१३) नावनोंदणी लिंक :- https://forms.gle/16J74ZR7oNHBzYCT8

**मा. श्री. अल्ताफहुसेन नसिरुद्दीन मुल्ला**
जनरल सेक्रेटरी,
श्री शिवाजी शिक्षण संस्था,
उच्च शिक्षण मंडळ, कराड


**मा. श्री. बाळासाहेब पांडुरंग पाटील (साहेब)**
अध्यक्ष,
श्री शिवाजी शिक्षण संस्था,
उच्च शिक्षण मंडळ, कराड

**प्रा. (डॉ.) श्रीमती स्वाती रामराव सरोदे**
प्र. प्राचार्य,
वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड









संपर्क : प्रा. (डॉ.) श्रीमती एम. ए. शिंदे मोबा. ९८५०३०५६२६

गुरुकृपा, कराड 9923735142